# राष्ट्रासाठी प्रार्थनेचा दिवस

## सर्व चर्चेसला आव्हान करण्यात येते की

## 16 ऑगस्ट 2020 हा दिवस प्रार्थना दिवस म्हणून पाळावा

आपल्या देशाच्या शांतीसाठी, सुबत्ता आणि स्थैर्यासाठी प्रार्थना करा

खिंडीमध्ये उभे राहा ! भारताला आशीर्वाद द्या

अधिक माहितीसाठी भेट द्या :

**www.nationaldayofprayer.in**

नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया आणि

इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडिया

यांचे सौजन्याने

अनुक्रमनिका

**परिचय** 5

**देशासाठी प्रार्थनेचा दिवस** 5

**नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया** 5

**इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडिया** 5

**आपल्यासाठी प्रार्थना करण्यासाठी शास्त्रपाठ** 6

**आपल्या पुढा—यांसाठी प्रार्थना करण्यासाठी शास्त्रपाठ** 6

**प्रार्थना आणि परिच्छेद** 7

स्तुती आणि प्रत्यर्पण 7

देवाची स्तुती करणे 7

परमेश्वर कृपाळू व दयाळू आहे, तो मंदक्रोध व अति दयाळू आहे 7

परमेश्वर सगळयांना चांगला आहे; त्याची दया त्याने केलेल्या सर्व कृत्यांवर आहे 7

हे परमेश्वरा तुझी सर्व कृत्ये तुझी स्तुती गातात; आणि तुझे भक्त तुझा धन्यवाद करितात 7

ते तुझ्या राज्याचा महिमा वर्णितात, आणि तुझा पराक्रम कथन करितात 7

ह्यासाठी की तुझे पराक्रम व तुझ्या राज्याचे वैभवयुक्त ऐश्वर्य ही मानवजातीस कळावी 7

तुझे राज्य युगानुयुग राहणारे राज्य आहे. तुझा राज्याधिकार पिढयानपिढया टिकणारा आहे 7

परमेश्वर आपल्या सर्व मार्गात न्यायी आहे. तो आपल्या सर्व कृत्यात दयाळू आहे. 7

पतन पावणा–या सर्वांना परमेश्वर आधार देतो, व वाकलेल्या सर्वांना उभे करितो. 7

देवाची लेकरे आहोत म्हणून धन्यवाद 8

क्षमा आणि नूतनीकरण 8

**ख्रिस्ती जीवन** 8

मीठ आणि प्रकाश असणे 8

दयाळू असणे 9

शिष्य बनविणे 9

सुवार्तेची घोषणा करणे 10

**घर** 10

प्रेमळ आणि काळजी घेणारे परिवार 10

बालक 11

युवक 11

वयस्कर 11

बालकांचा सर्वांगीण विकास 12

**देश आणि देशाच्या पुढा–यांसाठी** 12

देशासाठी प्रार्थना 12

राजकीय पुढा–यांसाठी प्रार्थना 13

सेनादलासाठी प्रार्थना 13

न्यायालये आणि न्यायालयीन व्यवस्थेसाठी प्रार्थना 13

नागरी सेवक 14

| | |
|---|---|
| पोलीस आणि कायद्याची अमलबजावणी करणा—या संस्था | 14 |
| आरोग्याची काळजी घेणारे व्यावसायिक | 14 |
| शिक्षक | 15 |
| सचोटी आणि पारदर्शकता | 15 |
| भ्रष्टाचार | 15 |
| संपतीचे समान वाटप | 16 |
| अर्थव्यवस्था | 16 |
| न्यायदानासाठी प्रार्थना | 17 |
| धर्म स्वातंत्र्य | 17 |
| **विशेष प्रार्थना** | 17 |
| कोविड 19 | 17 |
| धोक्यातील बालके | 18 |
| गरीब आणि पीडीत | 19 |
| परिवर्तनाचे पाईक म्हणून गरीब | 20 |
| विकलांग | 20 |
| कैदी | 20 |
| बेघर | 20 |
| गैरवर्तन आणि हिंसा सहन करणा—या लोकांसाठी प्रार्थना | 21 |
| गैरवर्तन आणि लिंगाधारीत हिंसा सहन करणा—या स्त्रियांसाठी प्रार्थना | 21 |
| माध्यमे, करमणूक आणि खेळ | 21 |
| **छळ होत असलेल्या चर्चसाठी प्रार्थना — रिलीज इंटरनॅशनल द्वारा** | 22 |

**परिचय**

## राष्ट्रासाठी प्रार्थनेचा दिवस

देव भारत राष्ट्रावर प्रेम करतो आणि त्यामध्ये त्याचे कार्य चालू आहे. चर्चला राष्ट्राची शांती, सुबत्ता आणि स्थैर्यासाठी प्रार्थना करण्यासाठी सांगण्यात आले आहे. आपल्या राष्ट्राची स्थिती आणि त्यासमोर असलेली आव्हाने आपल्याला सर्वसमर्थ देवाचे मूख पाहण्यासाठी आणि भारतावर त्याचा अविरत आशीर्वाद असावा यासाठी प्रार्थना करण्यासाठी चेतवितात.

रदबदलीची आवश्यकता लक्षात घेऊन, 2017 मध्ये इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडियाने विनम्रमपणे राष्ट्रीय प्रार्थना दिवसाची चळवळ सुरू केली.

इ.एफ.आय. सदस्य चर्चेस आणि संस्थांनी ठरविले की भारताच्या स्वतंत्र दिवसाच्या जवळच्या रविवारी राष्ट्रीय प्रार्थना दिवस पाळला जाईल : असा दिवस जेव्हा आम्ही आमच्या राष्ट्रासाठी देवाची स्तुती करू आणि त्याच्या गरजा आणि प्रश्नांसाठी प्रार्थना करू.

2019 मध्ये, नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया, तसेच कॅथॉलीक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडिया यांनी राष्ट्रीय प्रार्थना दिवसाला पुष्टी दिली आणि त्यांच्यासोबत सलग्न असलेल्यांना ही माहिती पाठवून त्यांनी यामध्ये सहभागी व्हावे आणि भाग घ्यावा असे सांगितले.

या वर्षी, नॅशलन कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया, आणि इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडिया, सयुक्तपणे 16 ऑगस्ट 2020 रोजी, संपूर्ण भारतभर राष्ट्रीय प्रार्थना दिवस साजरा करीत आहेत आणि आपला देश, आपले पुढारी आणि आपल्या सह नागरीकांसाठी कळकळीची रदबदली करणार आहेत.

सर्व पंथामधील सर्व चर्चेस, प्रार्थना चळवळी, ख्रिस्ती संस्था आणि ख्रिस्ती व्यक्तींना विनंती करण्यात येत आहे की 16 ऑगस्ट 2020, रविवार, हा दिवस आपल्या देशाचे कल्याण, शांती आणि भरभराटीसाठी प्रार्थना करण्याचा दिवस म्हणून पाळावा

## नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया

नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया (एनसीसीआय) ही प्रॉटेस्टंट आणि ऑर्थोडॉक्स चर्चेसची, तसेच भारतामधील सर्वांचा आदर करणा–या संस्था, क्षेत्रीय कॉन्सिल्स आणि प्रतिनिधी सर्वासाठी आदरभाव असणारी अभिव्यक्ती आहे. कॉन्सिलची स्थापना 1914 मध्ये झाली. एनसीसीआय, 30 सभासद चर्चेस, 17 क्षेत्रीय ख्रिस्ती कॉन्सिल्स, 18 सर्व भारतात कार्यरत संस्था आणि 7 संबंधित संस्थांनी मिळून बनलेली आहे. एनसीसीआय जवळ जवळ 14 दशलक्ष लोकांचे प्रतिनिधीत्व करते.

## इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडिया,

इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडिया, 1951 मध्ये स्थापीत, शुभवर्तमान प्रसार करणा–या ख्रिस्ती लोकांची एकजूट आहे. शुभवर्तमान प्रसार करणा–यांचे मध्यवर्ती जाळे म्हणून आणि सेवा पुरविणारी संस्था म्हणून, इएफआय, शुभवर्तमान प्रसार विश्वास, चळवळ आणि मुल्यांचे रक्षण करते, शुभवर्तमान प्रसार करणा–यांच्या आवाजाचे प्रतिनिधीत्व, क्षमता निर्माण आणि राष्ट्र उभारणी कार्यातील सहभागाचा पुरस्कार करते. तिच्या सदस्यामध्ये 54 प्रॉटेस्टंट संप्रदाय आणि संबंधित मंडळयांचा (65000 पेक्षा जास्त मंडळया) तसेच 150 पेक्षा जास्त चर्च संबंधित मिशन प्रतिनिधी आणि संस्थांचा समावेश आहे.

## आपल्यासाठी प्रार्थना करण्यासाठी शास्त्रपाठ

1 तीमथी 2:1.2, ''तर सर्वात प्रथम हा बोध करितो की, सर्व माणसांसाठी विनंत्या, प्रार्थना, रदबदल्या व उपकारस्तुती करावी. राजाकरिता व सर्व वरिष्ट अधिका–यांकरिता करावी, ह्यासाठी की, पूर्ण सुभक्तीने व गंभीरपणाने आपण शांतीचे व स्वस्थपणाचे असे आयुष्यक्रमण करावे.''

1 पेत्र 2:17, ''सर्वास मान द्या. बंधुवर्गावर प्रीति करा. देवाचे भय धरा. राजाचा मान राखा.''

रोम 13:1, ''प्रत्येक जणाने वरिष्ट अधिका–यांच्या अधीन असावे; कारण देवापासून नाही असा अधिकार नाही; जे अधिकारी आहेत ते देवाने नेमलेले आहेत.''

यिर्मया 29:7, ''तुम्हास पकडून ज्या नगरास मी नेले त्यांचे हितचिंतन करा व त्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करा; त्या नगराचे हित ते तुमचे हित.''

2 इतिहास 7:14, ''तर माझे नाम ज्यास दिले आहे त्या माझ्या लोकांनी दीन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गापासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंति ऐकून त्यांच्या पापांची क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन.''

**आपल्या पुढा–यांसाठी प्रार्थना करण्यासाठी शास्त्रपाठ**

स्तोत्र 2:10–11, ''राजांनो, आता शहाणे व्हा. पृथ्वीवरील न्यायधिशांनो, बोध घ्या. भीड धरून परमेश्वराची सेवा करा, कंपित होऊन हर्ष करा.''

नीतिसूत्रे 11:14, ''शहाणा मार्गदर्शक नसल्यामुळे लोकांचा अधःपात होतो, पण सुमंत्री बहुत असले म्हणजे कल्याण होते.

नीतिसूत्रे 21:1, ''राजाचे मन पाटाच्या पाण्याप्रमाणे परमेश्वराच्या हाती आहे. त्याला वाटेल तिकडे तो ते वळवितो.''

ईयोब 12:23–25, ''तो राष्ट्रांची समृध्दी करून मग त्यांचा विध्वंस करितो; तो राष्ट्रांचा विस्तार करून मग त्यांचा संकोच करितो. तो पृथ्वीवरील लोकनायकांची बुध्दि हरण करितो, त्यांस मार्गरहित वैराण प्रदेशात भटकावयास लावितो.''

नीतिसूत्रे 2:1–8, ''1. माझ्या मुला, जर तू माझी वचने स्वीकारशील, माझ्या आज्ञा आपल्याजवळ साठवून ठेविशील, 2. आपला कान ज्ञानाकडे देशील, आणि आपले मन सुज्ञानाकडे लावशील, 3. जर तू विवेकाला हाक मारिशील, सुज्ञतेची आराधना करिशील, 4. जर तू रूप्याप्रमाणे त्याचा शोध करिशील, व गुप्त निधीप्रमाणे त्याला उमगून काढिशील, 5. तर परमेश्वराच्या भयाची तुला जाणीव होईल, आणि देवाविषयीचे ज्ञान तुला प्राप्त होईल, 6. कारण ज्ञान परमेश्वर देतो, त्याच्या मूखातून ज्ञान व सुज्ञाता येतात; 7. सरंळासाठी तो यशप्राप्ती सुलभ करितो; सात्विकपणे चालणा–यांस तो ढाल आहे; 8. अशासाठी की त्याने नीतिमार्गाचे रक्षण करावे आणि आपल्या भक्तांचा मार्ग सांभाळावा.''

**प्रार्थना आणि परिच्छेद**

**स्तुती आणि पुनःस्थापना**

**देवाची स्तुती करणे**

परमेश्वर कृपाळू व दयाळू आहे, तो मंदक्रोध व अति दयाळू आहे

परमेश्वर सगळयांना चांगला आहे; त्याची दया त्याने केलेल्या सर्व कृत्यांवर आहे

हे परमेश्वरा तुझी सर्व कृत्ये तुझी स्तुती गातात; आणि तुझे भक्त तुझा धन्यवाद करितात

ते तुझ्या राज्याचा महिमा वर्णितात, आणि तुझा पराक्रम कथन करितात

ह्यासाठी की तुझे पराक्रम व तुझ्या राज्याचे वैभवयुक्त ऐश्वर्य ही मानवजातीस कळावी

तुझे राज्य युगानुयुग राहणारे राज्य आहे. तुझा राज्याधिकार पिढयानपिढया टिकणारा आहे

परमेश्वर आपल्या सर्व मार्गात न्यायी आहे. तो आपल्या सर्व कृत्यात दयाळू आहे.

पतन पावणा–या सर्वांना परमेश्वर आधार देतो, व वाकलेल्या सर्वांना उभे करितो.

स्तोत्र 145:8–14

तू धन्यवादीत आहेस, प्रभू देवा, तू युगानूयूग धन्यवादीत आहेत. पवित्र तुझे नाम, तू युगानूयुग धन्यवादीत आहेस. तुझ्या लोकांसाठी तुझी दया महान आहे; तू युगानूयूग धन्यवादीत आहेस. आमेन.

## आपण देवाची मुले आहोत म्हणून उपकारस्तुती

''देवाने जगावर एवढी प्रीति केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे.'' योहान 3:16. ''परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणा–यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.'' योहान 1:12

**प्रेमळ देवा,** आम्हावरील तुझ्या विस्मयकारक आणि सनातन प्रेमासाठी आम्ही तुझी स्तुती करितो. तुझा पुत्र येशु खिस्त, याला जगाच्या पापांसाठी बलीदान म्हणून पाठविल्याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. आम्ही आभार मानतो की जो कोणी विश्वासाने तुजवर भरवसा ठेवतो त्याला तू तुझे मुल होण्यासाठी तुझी कृपा पुरवितोस. आज तुझ्या प्रीतिची कोणातरी सोबत वाटणी करण्यास आम्हाला मदत कर.

## क्षमा आणि नूतनीकरण

2 इतिहास 7:14, ''तर माझे नाम ज्यास दिले आहे त्या माझ्या लोकांनी दीन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गापासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंति ऐकून त्यांच्या पापांची क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन.''

**दयाळू देवा,** आम्ही तुझ्या अभिवचनांवर विश्वास ठेवतो. आमची प्रार्थना ऐक, जेव्हा आम्ही स्वतःला तुजसमोर नम्र करतो आणि आमच्या पापांच्या क्षमेसाठी तुला विनंती करतो. तू वचन दिले आहे की जर आम्ही आपली पापे पदरी घेतली तर तू विश्वासू व न्यायी आहेस म्हणून आम्हाला सर्व अधर्मापासून शुध्द करिशील. (1 योहान 1:9). आमच्या देशासाठी आम्हाला आशीर्वाद दे आणि आमच्या देशाला रोगमुक्त कर.

## खिस्ती जीवन

### मिठ आणि प्रकाश असणे

''तुम्ही पृथ्वीचे मीठ आहा; पण जर मिठाचा खारटपणाच गेला तर तो खारटपणा त्याला कशाने आणता येईल? पुढे ते बाहेर फेकले जाऊन माणसांच्या पायाखाली तुडविले जाण्यापलीकडे त्याचा कसलाच उपयोग नाही. तुम्ही जगाचा प्रकाश आहा; डोंगरावर वसलेले नगर लपू शकत नाही. दिवा लावून मापाखाली ठेवीत नसतात, दिवठणीवर ठेवतात म्हणजे तो घरातल्या सर्वांना प्रकाश देतो; त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करावे.'' (मत्तय 5:13–16)

**जीवनाच्या देवा,** आमच्या कृतिकडून आम्ही तुजकडे लक्ष द्यावे असे होऊ दे, तू सर्व जीवनांमध्ये वैपूल्य आणणारा आणि आपली विपूलता आमच्यासोबत वाटणारा आहेस, तू असे वातावरण तयार करतोस की आम्ही सुध्दा आपल्या विपूलतेची इतरांसोबत वाटणी करावी. जीवनातील सर्व अंधकारामध्ये प्रकाश आणण्यास आमची मदत कर, चांगले जग निर्माण व्हावे यासाठी त्यामध्ये आशा पसरविण्यास आमची मदत कर, असे जग जेथे सलोख्याने एकत्र राहणा–या तुझ्या लेकरांकडून न्याय नांदेल. जीवनातील बेचवीमध्ये मिठ आणण्यास आमची मदत कर, चैतन्य आणि आनंदास प्रोत्साहन देण्यास आणि जे जग भविष्यासाठी आशा निर्माण करण्यास धजते, ज्याचे तू वचन देतोस, जेथे तुझी सर्व लेकरे स्वतःला ओळखतील, त्यांना मोल मिळेल आणि त्यांना ठेवा समजले जाईल, तुझ्या प्रतिमेत निर्माण केलेले आणि तुला नेहमी गौरव देणारे लोक जगामध्ये राहतील असे होऊ दे.

### दयाळू असणे

''आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हाला क्षमा केली आहे तशी तुम्हीहि एकमेकांना क्षमा करा.'' (इफिस 4:32).

**प्रिय प्रेमळ आणि दयाळू देवा,** सर्व देणग्यांच्या दात्या, आज तू विशेषकरून आम्हाला तुझी दया आणि प्रीति द्यावी अशी आम्ही प्रार्थना करतो. आमचे हृदय आणि अंतःकरण तुजसाठी उघड. तुझ्या दयेचा स्वीकार करण्यास लागणारी कृपा आम्हास पुरव. प्रतिदिवशी जीवन जगत असतांना, जे कमी नशिबवान आहेत त्यांच्यासाठी आम्ही प्रार्थना करतो, विशेषकरून जे दुखावलेले आहेत, आणि ज्यांचे घाव बरे करण्याची गरज आहे. आम्हाला अशा प्रकारे त्यांच्या दुःखात सहभागी होण्यास मदत कर की आम्ही किती तीव्रतेने त्यांची काळजी घेतो हे त्यांना कळावे. त्यांच्या संवेदना ऐकण्यासाठी आम्हाला व्यक्तिगत हिम्मत दे, आणि त्यांना तोडगा काढण्यास मदत कर, तुझी लेकरे म्हणून आणि आमचे भाऊ आणि बहिणी म्हणून तो मिळणे हा त्यांचा अधिकार आहे.

## शिष्य बनविणे

''तेव्हा येशु जवळ येऊन त्यांच्याशी बोलतांना म्हणाला, स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे. तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा; त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नांवाने बाप्तिस्मा द्या; जे काही मी तुम्हाला आज्ञापिले ते सर्व त्यास पाळावयास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.'' (मत्तय 28:18–20).

**प्रिय प्रभु येशू,** आम्ही आनंद करतो की स्वर्ग आणि पृथ्वीवर सर्व अधिकार तुझा आहे आणि आम्ही तुझी मुले आहोत, सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करण्यास तू आम्हाला बोलावले आणि साधनीभूत केले आहे. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आम्हाला शक्ती दे, आणि जीवनापासून जीवनापर्यंत सिध्द करणा–या संबधामध्ये सहभागी होण्यास शक्ती पुरव. ज्यांच्याकडे विपूल जीवन नाही त्यांच्यासोबत जीवनाची वाटणी करण्यास आमची मदत कर. तुझ्या नावाला गौरव मिळेल असे जीवन जगण्यास आमची मदत कर. तुझ्या जीवनाचे मोल आमच्या जीवनात आणि आमच्याद्वारे या जगात प्रगट होऊ दे.

## शुभवार्ता गाजविणे

''देवाने जगावर एवढी प्रीति केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे.'' योहान 3:16

**प्रिय प्रभु येशु,** आम्हाला माहित आहे की आमच्यासोबत राहण्यासाठी आणि सर्व जगाचा उध्दार करण्यासाठी तू या जगात आलास. तुझ्या उध्दार कार्याच्या कृतिचा हिस्सा होण्यास आमची मदत कर, यासाठी की आम्ही तुझ्या कृपेचे पाईक व्हावे. या जगामध्ये जीवंत सुर्वाता होण्यास आमची मदत कर, यासाठी की आम्ही आमच्या जीवनाकडून तुझी साक्ष द्यावी. तुझी सुर्वाता सांगण्याचे मार्ग समजण्यासाटी तू आम्हाला बुध्दी दे.

## घर

## प्रेमळ आणि काळजी घेणारे परिवार

''पतींनो, जशी खिस्ताने मंडळीवर प्रीति केली तशी तुम्हीहि आपआपल्या पत्नीवर प्रीति करा; खिस्ताने मंडळीवर प्रीति केली आणि स्वतःला तिच्यासाठी समर्पण केले.'' (इफिस 5:25).

“बापांनो, तुम्ही आपल्या मुलांना चिरडीस आणू नका; तर प्रभूच्या शिस्तीत व शिक्षणात त्यांना वाढवा.” (इफिस 6:4).

**प्रीतिपूर्ण देवा,** आमचे गृह आणि आमचे कुटुंब एकमेकांसाठीच्या प्रेमाने आणि आदराने भर, यासाठी की आम्ही सर्वांनी तुझ्या पवित्र नावाचे गौरव करावे. आम्हाला अर्थपूर्ण कौटूंबिक जीवन जगण्यास आव्हान दे, जे तुझ्या भोवती केंद्रित आहे. परस्परांसाठी असलेली प्रगल्भ समज आम्हाला दे, यासाठी की आम्ही आमच्या कौटूंबिक जीवनामध्ये हिंसाचारापासून दूर राहावे. तुझी प्रीति आणि कृपा याद्वारे गरजेमध्ये असणा–या इतर कुटूंबापर्यंत पोहोंचण्यास आमची मदत कर.

## बाळके

“नंतर त्याने बाळकांवर हात ठेवून प्रार्थना करावी म्हणून लोकांनी त्यांना ज्याच्याकडे आणिले; परंतु शिष्यांनी आणणा–यांना दटाविले. येशु म्हणाला, बाळकांना माझ्याकडे येऊ द्या, त्यांना मनाई करू नका, कारण स्वर्गाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे. मग त्यांच्यावर हात ठेवल्यानंतर तो तेथून गेला.” (मत्तय 19:13–15).

**सामर्थ्यशाली देवा,** आमच्या चर्चच्या कार्यक्रमामध्ये आम्ही बाळकांकडे दुर्लक्ष केले आणि त्यांना डावलले, त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले नाही किंवा आमची साधनसामग्री त्यांच्यासाठी खर्च केली नाही म्हणून आमची क्षमा कर. त्या गुलाम मुलींसाठी आम्ही आभारी आहोत, जिच्या साक्षीमुळे, सुरीयाच्या राजाच्या सेनेचा सेनापती नामान जीवंत आणि ख–या देवाकडे आला. (2 राजे 5:15)
.

## तरूण

“तरूण आपला वर्तनक्रम कशाने शुध्द राखील? तुझ्या वचनानूसार तो राखण्याने.” (स्तोत्र 119:9).

**दयाळू देवा,** आमच्या चर्चला आणि राष्ट्राला जे अमोल तरूण तू दिले आहेत त्यांना आम्ही तुझ्या कृपेच्या सिंहासनाकडे आणतो. आम्ही प्रार्थना करतो की आजच्या तरूणांना तुझ्या तळमळीने आणि तुझ्या वचनाप्रमाणे जीवन जगण्याच्या भुकेने भर. आपल्या जीवनाकडून तुझी सुर्वाता आणि कार्य इतरांना सांगण्याची तळमळ त्यांना दे. त्यांना वाईटापासून सोडीव आणि अढळपणे धार्मिकतेच्या आणि सत्कर्माच्या मार्गावर राहण्यास त्यांची मदत कर. तू ज्या देशामध्ये त्यांना ठेवले आहेस तेथे त्यांना आशीर्वाद आणि राजदूत कर.

## वयोवृध्द

‘उतारवयात माझा त्याग करू नको; माझी शक्ती क्षीण होत चालली असता मला सोडू नको.” (स्तोत्र 71:9).

**प्रिय देवपित्या,** आमच्या वयोवृध्दांसाठी आम्ही तुझे आभार मानतो. त्यांच्याकडे असणारी बुध्दी आणि अनुभवासाठी आणि आपल्या साधनांकडून आमची मदत करण्यासाठी असलेल्या त्यांच्या इच्छेसाठी आम्ही आभारी आहोत. त्यांच्या जीवनावरील तुझ्या आशीर्वादासाठी आम्ही आभारी आहोत आणि आम्ही प्रार्थना करतो की तू त्यांना तुझ्या गौरवार्थ निकोप, आंनदी आणि फलदायी ठेव. त्यांना शांती, आनंद आणि समाधानाने भर, यासाठी की ते नेहमी तुझी प्रीति आणि करूणा प्रतिबिंबीत करतील.

### बाळकांचा सर्वांगीण विकास

''परमेश्वराचे भय हे ज्ञानाचा प्रारंभ होय, पण मूर्ख लोक ज्ञान व शिक्षण तुच्छ मानितात.'' (नीतिसूत्रे 1:7).

''येशू ज्ञानाने, शरीराने आणि देवाच्या व माणसाच्या कृपेत वाढत गेला.'' (लूक 2:52).

**ज्ञानदात्या देवा,** आम्ही मागतो की आमच्या सर्व शैक्षणिक संस्था अशा प्रकारचे ज्ञान प्रदान करतील ज्याकडून विद्यार्थ्यांचा शारीरीक, मानसिक, सामाजिक आणि आत्मिक विकास होईल. जगाला समजू दे की तूच ज्ञानाचा खरा उगम आहेत आणि तुला ओळखल्याने आम्हाला आमच्या जीवनासाठी अर्थ आणि हेतू प्राप्त होतो. आम्ही प्रार्थना करतो की जगातील सर्व लेकरांना शिकण्याची संधी मिळावी आणि कोणतेहि बाळक त्याचा विश्वास, लिंग किंवा गरीबीमुळे शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

### राष्ट्र आणि राष्ट्रीय पुढा–यांसाठी

"ज्या राष्ट्रांचा देव परमेश्वर आहे, ज्या लोकांस त्याने प्रजा म्हणून निवडिले आहे, ते धन्य !''' (स्तोत्र 33:12).

**न्याय आणि शांतीदात्या देवा,** तू शासनकर्त्याचा राजांचा राजा आणि प्रभुंचा प्रभु आहेस. जे तुझा आदर करतात आणि तुझी सेवा करतात त्या सर्व राज्कर्त्याना आणि त्यांच्या लोकांना तू आशीर्वाद देतोस. आमच्या देशाला आशीर्वाद दे, हे देवा ! आम्ही आमच्या देशासाठी आणि त्यामध्ये राहणा–या सर्वांसाठी प्रार्थना करतो. सर्व राज्यकर्ते आणि अधिकारी यांना तुझी बुध्दी, ज्ञान आणि समज दे. त्यांनी तुझे भय धरावे आणि तुझा आदर करावा म्हणून त्यांची मदत कर . आमच्या लोकांना त्यांनी न्याय द्यावा असेहि होऊ दे. तुझ्या धार्मिकतेने आमचा देश भरून काढ. अंधकाराची सर्व सत्ता, उपहास, विनाश आणि अशुध्द आत्म्यांचा नाश होवो. आमच्या देशामध्ये शांती आणि सुबत्ता असू दे. प्रिय देवा, आम्ही आमच्या देशातील लोकांसाठी सुध्दा प्रार्थना करतो. त्यांच्या हाताच्या प्रयत्नांना यश दे. आमचा देश दूध आणि मधाने ओसंडून वाहू दे. आमची कोठारे भरलेली असू दे. तुझा आंनद आमच्या ह्रदयावर राज्य करो. तुझी शांती आमच्या देशावर राज्य करो. तुझ्या न्यायाने आमच्या देशाला भरून काढ. तुझी धार्मिकता

आमच्या जीवनाचे नियंत्रण करो, प्रिय देवा! आमच्या देशातील प्रत्येकावर आज आणि नेहमी तुझ्या आशीर्वादाचा वर्षाव कर. स्वातंत्र्य, शांती आणि सुबत्तेमध्ये राहण्यासाठी आमची मदत कर. सर्वशक्तीमान देवा, आमच्या देशाला आशीर्वाद दे आणि त्याला खरे स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुभावामध्ये आणि जे सर्वजण त्याला महान बनवित आहेत त्यांच्यासोबत ठेव.

## राजकीय पुढा–यांसाठी प्रार्थना

1 तीमथी 2:1–4, ''तर सर्वात प्रथम हा बोध करितो की, सर्व माणसांसाठी विनंत्या, प्रार्थना, रदबदल्या व उपकारस्तुती करावी. राजाकरिता व सर्व वरिष्ट अधिका–यांकरिता करावी, ह्यासाठी की, पूर्ण सुभक्तीने व गंभीरपणाने आपण शांतीचे व स्वस्थपणाचे असे आयुष्यक्रमण करावे हे आपला तारणारा देव ह्याच्या दृष्टिने चांगले व स्वीकारावयास योग्य आहे. त्याची अशी इच्छा आहे की सर्व माणसांचे तारण व्हावे व त्यांनी सत्याच्या परिपूर्ण ज्ञानाप्रत पोहोंचावे.''

**शक्ती आणि सामर्थ्याच्या देवा,** तुझ्या अधिकाराद्वारे ज्ञान आणि न्याय चांगल्याप्रकारे हाताळले जातात, कायदे अमलात आणले जातात, आणि निकाल जाहीर करण्यात येतो. तुझ्या बोधाच्या आणि धैर्याच्या आत्म्याने आमच्या भारत देशाचे राष्ट्रपती, प्रधानमंत्री, संसद सदस्य आणि विधान सभा आणि इतर राजकीय पुढा–यांना मदत कर. त्यांनी सदैव धार्मिकता, न्याय आणि दया यांची कास धरावी असे होऊ दे. तुझ्या सामर्थ्यशाली संरक्षणाने त्यांनी आमच्या देशाला प्रामाणिकपणाने आणि सचोटीने चालवावे असे होऊ दे.

## सशस्त्र सेना

''परमेश्वर जो माझा दुर्ग त्याचा धन्यवाद होवो; तो माझ्या हातांना लढावयास शिकवितो; माझ्या बोटांना युध्द करण्यास शिकवितो. तो माझा दयानिधी, माझा मुक्तिदाता, माझी ढाल आहे; मी त्याचा आश्रय धरितो. तो माझ्या प्रजाजनांना माझे अंकित करितो.'' (स्तोत्र 144:1–2).

**दयाळू देवा,** आमच्या सशस्त्र सेनेतील सर्व पुरूष आणि स्त्रीया, ज्या देशात आणि देशाबाहेर आहेत, त्यांना तुझ्या कृपाळू काळजीखाली सोपवितो. तुझ्या स्वर्गीय कृपेने प्रतिदिवशी त्यांचे रक्षण कर, त्यांच्या परीक्षेमध्ये आणि मोहपाशामध्ये तू त्यांना शक्ती दे आणि आपल्यावर येणा–या संकटांना तोड देण्यासाठी त्यांची मदत कर आणि त्यांना कळू दे की तुझ्या प्रीतिपासून त्यांना काहीहि विभक्त करू शकत नाही.

## न्यायालये आणि न्यायप्रणालीसाठी प्रार्थना

''नीति व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत; दया व सत्य तुझे सेवक आहेत.'' (स्तोत्र 89:14).

**प्रिय देवा**, तू धार्मिकतेवर प्रेम करतोस आणि बेबंदशाहीचा द्वेष करतोस, आणि तू आपल्या सर्व मार्गात न्यायी आहेस. तुझ्या राज्याचा राजदंड (अधिकार) हा सरळतेचा राजदंड आहे आणि धार्मिकता आणि न्याय तुझ्या सार्वभौम शक्तीचा पाया आहेत. आम्ही आमची न्यायालये आणि न्याय व्यवस्थेसाठी प्रार्थना करतो की त्यांनी धार्मिकता आणि न्यायाचा पुरस्कार करावा. भारताच्या संविधानासाठी आम्ही तुझे आभार मानतो, जी लोकशाही आणि सर्वसमावेशकतेला मोल देते. आम्ही सर्व न्यायाधीश, वकील आणि न्यायालयीन कर्मचा–यांसाठी प्रार्थना करतो, त्यांना खूप ज्ञानाने आणि तुझ्या भयाने आशीर्वादीत कर, यासाठी की कायद्याच्या राज्याला आद्यस्थान मिळावे. न्यायालयामध्ये ज्या खटल्यांचा ढीग जमा झाला आहे त्यांच्यासाठी आम्ही प्रार्थना करतो, की ते खटले ऐकले जावेत आणि लवकरात लवकर निकाली लागावे, आणि न्याय प्रणाली पिळवणूक करणारी किंवा भ्रष्टाचारी किंवा फार जास्त खर्चिक आणि गरीबांच्या आणि कमी महत्व असलेले लोक पोहोंचू शकणार नाहीत अशी नसावी.

## नागरी सेवक

''तुम्ही कोणीहि आपलेच हित पाहू नका, तर दुस–यांचेहि पाहा.'' (फिलीप्पै 2:4)

**प्रिय प्रभु येशू ख्रिस्ता,** सर्व नागरी सेवकांना आम्ही तुझ्या हातात सोपवून देतो आणि ते करीत असलेल्या कामासाठी आम्ही तुझे उपकार मानतो. आम्ही प्रार्थना करतो की लोकांसाठी आणि ज्या समुदायाची ते सेवा करतात त्यांच्यासाठी त्यांची हृदये संवेदनशील असू दे, यासाठी की त्यांनी आपल्या हितापेक्षा दुस–यांचे हित पाहावे. ज्यांना आम्ही नावाने ओळखतो त्यांच्यासाठी आम्ही निश्चीतपणे प्रार्थना करतो.

## पोलीस आणि कायदा अमलबजावणी करणारे विभाग

''गरीब आणि अनाथ ह्यांचा न्याय करा. दीन व कंगाल ह्यांची दाद घ्या. गरीब व गरजवंत ह्यांना मुक्त करा; दुर्जनांच्या हातातून त्यांना सोडवा.'' (स्तोत्र 82:3–4).

**सर्वशक्तीमान देवा,** आम्ही प्रार्थना करतो की आमच्या प्रिय पोलीस अधिका–यांकडे तू लक्ष दे आणि तुझ्या प्रेमाने त्यांचे रक्षण कर. ते दिवस आणि रात्र आम्हाला सुरक्षित ठेवत असतांना त्यांचे मार्गदर्शन कर आणि जर त्यांच्यावर संकट आले तर त्यांना तुझ्या काळजीमध्ये पक्के धरून ठेव. त्यांना खरी शक्ती आणि हिम्मत दे, जेव्हा ते आपले कर्तव्य संपेपर्यंत सेवा करतील आणि कृपाकरून त्यांचा परिवार आणि मित्रमंडळीचे सुध्दा रक्षण कर.

## आरोग्य सेवा कर्मचारी

''तर पाहा, मी या नगरास आरोग्याचे उपचार करीन, त्या लोकांस बरे करीन, आणि शांती व सत्य यांचे वैपूल्य त्यांच्या ठायी प्रगट करीन.'' (यिर्मया 33:6).

**हे दयाळू देवा,** ज्या तू आश्चर्यकारपणे मानवाला आपल्या प्रतिरूपाचे घडविले आहे, आणि आमच्या शरीराला पवित्र आत्म्याचे मंदीर केले आहे, आमचे डॉक्टर्स आणि परिचारीका आणि त्या सर्वांना, ज्यांना तू निरोगी करण्याच्या अभ्यासासाठी आणि आजारी लोकांना बरे करयासाठी आणि आजार आणि वेदनांपासून बचाव करण्यासाठी बोलावले आहे त्यांना पवित्र कर, अशी आम्ही तुला प्रार्थना करतो त्यांना तुझ्या जीवन देणा—या आत्म्याने शक्ती दे, यासाठी की त्यांच्या सेवेद्वारे समुदायाच्या आरोग्याला पुष्टी मिळेल आणि तुझ्या निर्मीतीचे गौरव होईल.

## शिक्षक

''तू शिक्षण दृढ धरून ठेव; सोडू नको. ते जवळ राख. कारण ते तुझे जीवन आहे.'' (नीतिसुत्रे 4:13).

**प्रिय देवा,** आमच्या शिक्षकांना तुझ्या ज्ञानाचे वैपूल्य दे. आमच्या प्रियजनांवर प्रीति करण्यासाठी आणि त्यांचे स्वागत करण्यासाठी त्यांची मने तयार कर, आणि आम्हीहि त्यांच्यावर प्रेम करावे आणि त्यांचा सन्मान करावा असे कर. ते विद्यार्थ्यांची मदत करीत असतांना त्यांना कृपा पुरव, जेव्हा ते प्रगती न करणा—या विद्यार्थ्यांची मदत करतील, जे बोलले पाहिजे ते बोलण्यास त्यांना हिम्मत दे, प्रेमाने कधी आणि कसे बोलावे हे समजण्यासाठी त्यांना साधने आणि ज्ञान पुरव, आणि जेव्हा दुर्बलता वाटेल तेव्हा त्यांना शक्ती दे.जेव्हा आपल्याला कोणी पाहात नाही असे त्यांना वाटेल, त्यांना स्मरण दे की कोणतीहि हालचाल नजरेतून सुटत नाही. ते एक दशलक्ष लहान आणि तरीहि आश्चर्यकारकरीत्या महत्वपूर्ण लोकांचे भविष्य घडवित आहेत. आमच्या लेकरांसोबत ते शिकण्याची देणगी वाटत आहेत त्यासाठी आम्ही कृतज्ञ आहोत. प्रभु, त्यांना आशीर्वाद दे आणि त्यांचा विश्वासूपणा येणा—या पिढीवर कसा पगडा टाकणार आहे याचे किरण त्यांना दिसू दे.

## सचोटी आणि पारदर्शकता

''ह्या कारणास्तव तुम्ही करहि देता; कारण अधिकारी देवाची सेवा करणारे आहेत व ते ह्याच सेवेत तत्पर असतात. ज्याला जे द्यावयाचे त्याला ते द्या; ज्याला कर द्यावयाचा त्याला तो द्या; ज्याला जकात द्यावयाची त्याला ती द्या; ज्याचा धाक धरावयाचा त्याचा धाक धरा व ज्याचा सन्मान करावयाचा त्याचा सन्मान करा.'' (रोम 13:6—7).

**न्यायाच्या देवा,** तु तुझ्या निर्मीतीला नेहमीच पुरवठा करतो यासाठी की सर्वांनी तुझी इच्छा आहे तसे राहावे. तू आमच्या राष्ट्राला विपूल मनुष्य आणि नैसर्गिक साधनांनी आशीर्वादीत केले आहे, यासाठी की त्यांचा वापर तुझ्या सन्मानासाठी आणि गौरवासाठी आणि आमच्या नागरीकांच्या

सर्वसामान्य उपयोगासाठी व्हावा. तू दिलेल्या या देणग्यांचा आणि आशीर्वादाचा, अन्याय, लाचखोरी आणि भ्रष्टाचार करून आम्ही चूकीचा उपयोग केला आहे त्यासाठी आम्हाला खेद होत आहे, परिणामी आमच्या लोकांपैकी बरेचसे लोक भुकेले आहेत, आजारी आहेत, अज्ञानी आहेत आणि रक्षण विरहीत आहेत. आमचा विश्वास आहे की केवळ तूच आम्हाला आणि आमच्या देशाला या आजारापासून बरे करू शकतो. म्हणून आम्ही तुला विनंती करतो की आमच्या जीवनाला आणि आमच्या पुढा—यांच्या जीवनाला आणि लोकांना स्पर्श कर, यासाठी की आम्हाला लाचखोरीचा आणि भ्रष्टाचाराचा दुष्टपणा लक्षात येईल आणि आम्ही त्याचे उच्चाटन करण्यासाठी कठोर परिश्रम घेवू. आमच्यासाठी देवाचे भय धरणारे पुढारी समोर आण जे आमची काळजी घेतील आणि आम्हाला सुबत्तेच्या, सचोटीच्या आणि सर्वाचे भले करणा—या मार्गावर ने.

## संपत्तीचे समान वाटप

''पण तू आपला देव परमेश्वर याचे स्मरण ठेव कारण त्याने तुझ्या पूर्वजांशी शपथपूर्वक केलेला करार कायम राखण्यासाठी तोच तुला आजच्याप्रमाणे धनप्राप्ती करून घेण्याचे सामर्थ्य देत आहे.'' (अनुवाद 8:18)

''माझा देव आपल्या संपत्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशुच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरविल.'' (फिलीप्पै 4:19).

**जीवनदात्या देवा,** आम्ही प्रार्थना करतो की ज्या साधनांनी तू आम्हाला आशीर्वादीत केले आहे त्यांचा न्याय्य आणि योग्य वाटप व्हावा. जगभरातील पुष्कळ लोकांनी स्वीकारावे की तू सर्व धनसंपतीचा उगम आहेस आणि त्यांनी सर्व साधनांचे विश्वासू कारभारी व्हावे असे कर. तुझ्या आत्म्याच्या द्वारे हावरटपणावर विजय मिळविण्यास आमची मदत कर आणि आमच्या जीवनावर पैशाची असलेली पकड ढिली करण्यास आमची मदत कर. आम्ही धनापेक्षा लोकांची निगराणी राखावी असे कर आणि आम्हाला आनंदाने देणारे बनीव, यासाठी की, कोणाकडेहि फार थोडे आणि कोणाकडेहि खूपच जास्त असणार नाही.

## अर्थव्यवस्था

''पण, तू आपला देव परमेश्वर ह्याचे स्मरण ठेव कारण त्याने तुझ्या पुर्वजांशी शपथपूर्वक केलेला करार कायम राखण्यासाठी तोच तुला आजच्याप्रमाणे धनप्राप्ती करून घेण्याचे सामर्थ्य देत आहे.'' (अनुवाद 8:18).

**कृपाळू देवा,** आम्हाला माहित आहे की तुझे प्रेम अमर्यादीत आहे आणि तू आमच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये आमची काळजी घेतो. आर्थिक असुरक्षिततेच्या वेळी, आम्हाला असा विश्वास ठेवण्यास मदत कर की सर्व सुरक्षितता तुजमध्ये आहे. ह्याची जाणीव ठेवण्यास मदत कर की

तू नेहमीच आमची गरज पुरविली आहेस आणि आताहि आमची गरज तू पुरविशील. तुझ्याशिवाय आम्ही काहीच करू शकत नाही.

**दयाळू देवा,** आम्ही विनंती करतो की आमच्या देशाच्या नेत्यांना आमच्या देशाचे आणि जगाचे सध्याच्या आर्थिक संकटामधून नेण्यास मार्गदर्शन कर. गरीबांचे रक्षण करण्यास आणि जे सर्वजण या कठीण परिस्थितीमध्ये झगडत आहेत त्यांचे रक्षण करण्यास आमची मदत कर. त्यांच्यासाठी नविन संधी उघड आणि मानसन्मानाने जगण्यासाठी त्यांना साधनसामग्री पुरव. ज्यांच्याकडे पुरेसे आहे त्यांनी आपली सामग्री, ज्यांना जीवनावश्यक वस्तुंची कमतरता आहे, त्यांच्यासोबत वाटणी करावी म्हणून त्यांची मदत कर आणि त्यांनी तसे नम्र, कृतज्ञ आणि प्रेमळ हृदयाने करावे असे होऊ दे.

**न्यायासाठी प्रार्थना**

''तर परमेश्वराच्या भयाची तुला जाणीव होईल आणि देवाविषयीचे ज्ञान तुला प्राप्त होईल.'' (नीतिसुत्रे 2:5).

**प्रिय प्रभु,** आम्ही विनंती करतो की तुझे भय, जे ज्ञानाचा प्रारंभ आहे, सर्वांवर राहो जे आमच्या देशामध्ये न्याय देण्याचे निर्णय घेत असतात. तुझ्या प्रेमाच्या अग्नीने आणि सर्वांना न्याय देण्याच्या इच्छेने लोकांची मने भर.

**धर्मस्वातंत्र्य**

हे देवा, आमच्या निर्माणकर्त्या, तुझ्या भाग्यवान हातांनी तू आम्हाला जीवनाचा हक्क आणि स्वातंत्र्य दिले आहे. तू आम्हाला तुझे लोक म्हणून बोलावले आहे आणि तूच जो एकमेव खरा देव, आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त. त्याची भक्ती करण्याचा अधिकार आणि कर्तव्य दिले आहेस, तुझ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आणि कार्याने तू आम्हाला या जगामध्ये आमच्या विश्वासाप्रमाणे जगण्यास बोलावतो, सुवार्तेचा प्रकाश आणि तारण करणारा विश्वास समाजाच्या सर्व कानाकोप–यापर्यंत पोहोचविण्यास आमची मदत कर. धर्म स्वातंत्र्याच्या देणगीचे दक्षतापूर्वक रक्षण करत असतांना आम्हाला आशीर्वाद दे. आम्हाला आमचे धर्म स्वातंत्र्य जेव्हा धोक्यात येईल तेव्हा त्याचे रक्षण करण्यासाठी मनाची आणि हृदयाची शक्ती दे. तुझ्या चर्चच्या वतीने आमचा आवाज आणि सर्व लोकांच्या विश्वासाचा विवेक ऐकला जावा अशी हिम्मत आम्हाला दे. (Adapted from the Prayer of Protection of Religious Liberty by U.S. Conference of Catholic Bishops for the fortnight for Freedom, 2012).

**विशेष प्रार्थना**

**कोविड 19**

''तू भिऊ नको, कारण मी तुझ्याबरोबर आहे; घाबरू नको, कारण मी तुझा देव आहे; मी तुला शक्ती देतो; मी तुझे साहाय्यहि करितो; मी आपल्या धार्मिकतेच्या उजव्या हाताने तुला सावरितो.'' (यशया 41:10).

**प्रेमळ प्रभु,**

आम्ही प्रार्थना करतो की, तुझे प्रेम आणि करूणा आमच्यावर विपूल राहो, जेव्हा आम्ही या आव्हानात्मक दिवसामधून जात आहोत.

जे लोक दूरगामी परिणाम होणारे निर्णय घेण्याचे ओझे वाहातात त्याना ज्ञान मिळावे अशी आम्ही विनंती करतो.

जे लोक या आजाराच्या वेदना सहन करीत आहेत आणि जे सर्वजण त्यांची काळजी घेत आहेत त्या सर्वांसाठी आम्ही प्रार्थना करतो.

वयावृध्दांचे आणि कमजोर असलेल्यांचे, त्यांनी विषाणूचे भक्ष होऊ नये म्हणून तू त्यांचे रक्षण कर.

आम्ही प्रार्थना करतो की चुकीच्या माहितीला आळा घाल, यासाठी की भयाने हृदय आणि मनाची पकड घेऊ नये.

आम्ही शहाणपणाचा वापर करीत असतांना, जो तू तुझ्या दयेने आम्हाला पुरवित आहेस, आम्हाला मदत कर की आम्ही प्रत्येक दिवसाला विश्वास आणि शांतीने सामोरे जावे , आमच्यासाठी असलेल्या तुझ्या चांगूलपणावर आम्ही विश्वास ठेवावा. आमेन.

*मदर्स युनियनची कोविड 19 साठी प्रार्थना.*

**रोग बरे करणा—या, पुर्णतेच्या देवा,**

आम्ही आमची भग्नता, आमचा पापीष्टपणा, आमचे भय आणि निराशा तुझ्या पायावर ठेवतो.

रोग बरे करणा—या, पुर्णतेच्या देवा, आम्ही आमचे हृदय आणि हात, मन आणि जीव, तुझ्या स्पर्शाची जाणीव व्हावी आणि केवळ तू देतोस ती शांती अनुभवास यावी, म्हणून तुजकडे आणतो.

रोग बरे करणा—या, पुर्णतेच्या देवा, तुझ्या सहवासातील आणि सामर्थ्यामधील या क्षणी, आम्हाला विश्वास आणि आत्मविश्वास दे यासाठी की भग्न जीवन जोडले जावो.

A contemporary Confession by John C. Birch (https:faithandworship.com, 2016).

**धोक्यात असणारी मुले**

''त्याने बेथलेहेमात आणि व आसपासच्या सर्व प्रदेशात जे दोन वर्षाचे व त्याहून कमी वयाचे बाळक होते त्या सर्वांना त्याने माणसे पाठवून त्यांच्याकडून जिवे मारले.'' (मत्तय 2:16).

**शक्ती देणा–या देवा,** तू आज देशातील सर्व बाळकांसोबत राहावे अशी आम्ही प्रार्थना करितो, विशेषतः ज्यांना टाकून देण्यात आले आहे, जे अनाथ आहेत, निराश्रीत, ज्यांची चोरटी ने आण करण्यात येत आहे किंवा ज्यांच्यावर अत्याचार करण्यात येत आहे, त्यांच्यासोबत ऐस. होऊ दे की सरकार आणि लोकांनी हा अत्याचार थांबवावा आणि तुझ्या लोकांनी हे थांबावे म्हणून प्रतिबंध करावा, अशा बाळकांना सोडवावे आणि अशा बाळकांचे पुनःर्वसन करावे ज्यांची चोरून ने आण करण्यात येत आहे आणि ज्यांच्यावर अत्याचार होत आहेत.

**गरीब आणि दुःख भोगणारे**

''जर तू आपल्या जिवाला इष्ट ते भुकेल्यास देशील, दुःखग्रस्त जीवास तृप्त करिशील, तर तुझा प्रकाश अंधकारात झळकेल; निभीड अंधकार तुला मध्यान्हाचे तेज असा होईल.'' (यशया 58:10)

**प्रिय प्रभु देवा,** तू लहानतल्या लहानाला मान देण्यासाठी आलास, जे विसरले गेले आहेत, डावललेले आहेत आणि ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांच्यासाठी तू आलास. तू शेवटल्याला पहिली जागा देण्यासाठी आलास, जे मागे टाकण्यात आले आहेत, ज्यांच्याबाबत गैरसमज झाला आहे, ज्यांचे मोल कमी आहे त्यांच्यासाठी तू आलास. हरवलेल्यांचे जोरदार स्वागत करण्यासाठी, जे अनाथ आहेत, टाकून देण्यात आलेले आहेत आणि निराश्रीत आहेत त्यांच्यासाठी तू आलास. त्यांची आरोळी ऐकण्यासाठी तुझे कान होण्यास आमची मदत कर. प्रेम आणि स्विकाराचा तुझा आवाज होण्यासाठी आमची मदत कर. जे गरजू आहेत त्यांच्या बाजूने चालण्यासाठी तुझे पाय होण्यासाठी आमची मदत कर. दुस–यांना कपडे घालण्यासाठी, जेवू घालण्यासाठी आणि आश्रय देण्यासाठी तुझे हात होण्यास आमची मदत कर.

**गरीब, रूपांतराचे प्रतिनीधी**

''एक लहानसे नगरे होते, त्यात थोडेच लोक होते; त्यावर एका मोठया राजाने चढाई करून त्यास वेढा दिला व त्याच्यासमोर मोठाले मोरचे लाविले. त्यांत एक गरीब पण बुध्दिमान मनुष्य होता; त्याने आपल्या बुध्दिबलाने त्या नगराचा बचाव केला; पण त्या गरीब मनुष्याचे स्मरणहि कोणाला राहिले नाही. तेव्हा मी म्हणालो, बलाहून ज्ञान श्रेष्ट खरे; तथापी, गरिबाची अक्कल लोक तुच्छ मानतात आणि त्याचे शब्द ऐकत नाहीत.'' (उपदेशक 9:14–16).

''जर तू आपल्या जिवाला इष्ट ते भुकेल्यास देशील, दुःखग्रस्त जीवास तृप्त करिशील, तर तुझा प्रकाश अंधकारात झळकेल; निभीड अंधकार तुला मध्यान्हाचे तेज असा होईल.'' (यशया 58:10)

**न्यायाच्या देवा,** आम्ही जाणतो की गरीब सुध्दा रूपांतराचे प्रतिनीधी आहेत. आम्ही प्रार्थना करतो की आमच्या देशाचे श्रीमंत लोक आणि राज्यकर्ते आपला अधिकार गरीबांवर वर्चस्व गाजविण्यासाठी आणि त्यांच्याबाबत भेदभाव करण्यासाठी वापरणार नाहीत, उलट ते त्यांना संधी उपलब्ध करून देतील आणि विकासासाठी साधने पुरवितील. जगभरातील तुझी मंडळी, जे आजारी असल्यामुळे दुःख भोगीत आहेत त्यांचे ओझे घेईल असे होवू दे गरीबी, व्याधी, आणि जगभरातील कुपोषण याबाबत तुझी मंडळी ओझे घेवो.

## विकलांग

''तेव्हा अंधांचे डोळे उघडतील, बहि—यांचे कान खुले होतील.'' (यशया 35:5).

**प्रिय प्रभु, करूणामय देवा,** प्रभु येशू ख्रिस्तामध्ये जे आंधळे आणि बहिरे होते, पंगू आणि शिकण्यास मंद होते, त्यांची तू काळजी घेतली. आम्ही विवीध लोक म्हणून, वेगवेगळी क्षमता असलेले म्हणून एकत्र आलो आहोत. एकमेकांना वैद्यकीय उभारी देवून संपन्न करण्यास आमची मदत कर. जरी आम्हाला ठाऊक आहे की केवळ तुझ्याद्वारेच आम्ही सबळ होतो, तरी आम्ही लक्षात घेतो की आमच्यापैकी काही जणांना विशेष काळजी आणि मदतीची गरज आहे. जे मित्र गरजेमध्ये आहेत त्यांच्यापर्यंत आमचे हात लांब करण्यासाठी आम्हाला साधनीभूत कर, यासाठी की तुझे प्रेम फुलावे आणि ते आमच्या परस्परांसाठी असलेल्या कृतितून व्यक्त व्हावे.

## कैदी

''बंधनात पडलेल्यांबरोबर तुम्ही बंधनात आहात असे समजून त्यांची आठवण करा; आपणहि देहात आहो म्हणून पीडीतांची आठवण ठेवा.'' (इब्री 11:3).

प्रिय प्रभु येशू खिस्ता, जे बंदीशाळेमध्ये आहेत त्यांच्या पर्यंत पोहोंचण्यासाठी आमची मदत कर, आम्ही आठवण ठेवावी की आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि आम्हाला ख्रिस्ताच्या नीतीमत्वामध्ये जीवन जगण्यासाठी दुसरी संधी देण्यात आली आहे.

## बेघर

''तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यास म्हणेल, अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादीतहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुम्हाकरिता सिध्द केले आहे ते वतन घ्या; कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खावयास दिले, तान्हेला होतो तेव्हा मला प्यावयास पाणी दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले, उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले, आजारी होतो तेव्हा माझ्या भेटीला आला, बंदिशाळेत होतो तेव्हा तुम्ही माझ्याकडे आला.'' (मत्तय 25:34—36).

**करूणेच्या देवा,** मानवजातीसाठीचे तुझे प्रेम येशुद्वारे प्रगट करण्यात आले, ज्याचे पृथ्वीवरील आयुष्य गव्हाणीच्या गरीबीने सुरू झाले आणि शेवट वेदनेमध्ये वधस्तंभावरील एकांतवासात झाला; जे बेघर आणि गरजू आहेत त्यांना आम्ही तुजसमोर आणतो. त्यांच्या जवळ ये आणि आत्म्यामध्ये त्यांचे सांत्वन कर आणि जे त्यांना आश्रय देतात, अन्न, आणि मैत्री देतात त्यांना आशीर्वाद दे. तुझी मंडळी अशा लोकांसाठी सांत्वन आणि मैत्रीचा स्त्रोत होऊ दे.

## अत्याचार आणि हिंसा सहन करणा–या लोकांसाठी प्रार्थना

''हे परमेश्वरा, तू दीनांचा मनोरथ पूर्ण केला आहे; त्यांचे मन तू स्थिर करितोस. पोरक्यास व पीडीतास न्याय मिळावा आणि मातीपासून घडलेल्या मनुष्याने त्यास इतपर दहशत घालू नये म्हणून तू त्यांच्याकडे कान देतोस.'' (स्तोत्र 10:17–18)

**सर्वसमर्थ देवा,** आम्ही क्रूर वागणूक मिळणारे आणि हिंसेचा सामना करणा–या सर्वासाठी प्रार्थना करतो. आम्ही विनंती करतो की तुझी काळजी त्यांच्याभोवती असावी आणि तुझ्या प्रेमळ सामर्थ्याने तू त्यांचे रक्षण कर आणि आरोग्य आणि रोगमुक्ती, पूर्णता आाणि शक्ती, शांतपणा, शांती आणि प्रेम यांचा आनंद घेण्यास त्यांना मूभा दे. याहून जास्त, आम्ही प्रार्थना करतो की त्यांना तुझ्या सान्निध्याची जाणीव होऊ दे आणि तुजमध्ये आत्मविश्वास मिळू दे. प्रभु देवा, तुझा पुत्र दुष्टांच्या हाती धरून दिला गेला होता, तरी त्याने आपला छळ करणा–यांसाठी प्रार्थना केली आणि वधस्तंभावरील रक्ताने द्वेषावर विजय मिळविला. जे लोक हिंसाचाराला तोंड देत आहेत त्यांना मनाची शांती प्रदान कर आणि तुझे संरक्षण आणि काळजीवरील त्यांचा विश्वास पुन्हा नविन कर. इतरांच्या हिंसाचारापासून आमचे सरंक्षण कर, द्वेषाच्या हत्यारांपासून आम्हाला सुंरक्षित ठेव आणि धीर गंभीरता व शांती पुन्हा स्थापीत कर.

## स्त्री असल्यामुळे क्रौर्य आणि हिंसाचाराचा सामना करणा–या स्त्रीयांसाठी प्रार्थना

''परमेश्वर पीडीतांसाठी उच्च दुर्ग आहे; तो संकटसमयी उच्च दुर्ग आहे.'' (स्तोत्र 9:9).

महान देवा, आम्ही तुला धन्यवाद देतो की तू आम्हाला अबोल राहण्यामधून बाहेर पडण्यास सांगतोस आणि लपलेल्या घरगूती लिंगाधारीत हिंसाचाराबददल बोलण्यास लावतो. आम्ही त्या सर्व स्त्रीयांसाठी प्रार्थना करतो ज्या हिंसाचार सहन करीत असून सुध्दा, कुटूंब आणि लेकरांची काळजी घेणे, अन्न उत्पन्न करणे, तयार करणे, पाणी आणणे, उदारनिर्वाह कमविणे आणि इतर रीतीने दुस–यांची मदत करणे चालू ठेवत आहेत. आम्ही त्या स्त्रीयांसाठी प्रार्थना करतो ज्यांना घरगूती कामदार किंवा लिंग कामदार म्हणून चोरून नेण्यात येत आहे; ज्या स्त्रीयांवर बलात्कार होत आहेत आणि आपल्या वेदना व्यक्त करण्यासाठी किंवा भविष्याचा मार्ग शोधण्यासाठी त्यांना शब्द सापडत नाहीत. आमच्या समाजाच्या परिवर्तनासाठी आम्ही प्रार्थना करतो, ज्याला अन्यायाची समस्या सोडविण्यापेक्षा, हिंसाचाराला बळी पडलेल्या लोकांचा न्याय करणे सोपे जाते. आम्ही प्रार्थना करतो की स्त्रीयांचा आवाज ऐकला जावू दे आणि त्यांचे म्हणणे सर्व शांती

आणि समेटाच्या कामामध्ये ऐकले जावे. पुष्कळ पुरूष स्त्रीयांसोबत ज्या हिंसाचाराने वागतात आणि स्त्रीयांबाबत विचार करतात त्यांच्या विचारसरणीमध्ये परिवर्तन व्हावे अशी आम्ही प्रार्थना करतो. आम्ही वाट पाहातो आणि शांतीच्या युगासाठी प्रार्थना करतो, जेव्हा हिंसाचार हद्दपार होईल, पुरूष आणि स्त्रीया दोघेहि एक दुस–यावर प्रेम करतील आणि त्यांच्यावर प्रेम केले जाईल, आणि जगाच्या धनसंपत्तीचे सुयोग्यपणे वाटप केला जाईल.

## प्रसार माध्यमे, करमणूक आणि खेळ

''बंधंनो, शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदरनीय, जे काही न्याय्य, जे काही शुध्द, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्‌गूण, जी काही स्तुती, त्यांचे मनन करा.'' (फिलीप्पै 4:8).

**जीवनदात्या देवा,** तू सर्व गोष्टींचा निर्माणकर्ता आहेस, आणि तू आम्हाला तुझ्या प्रतिमेमध्ये निर्माण केले आहे, यासाठी की आम्ही तुझ्यासारखे निर्मीतीक्षम असावे. आमच्या जीवनावर माध्यम आणि खेळांचा जबरदस्त पगडा आहे हे आम्ही मान्य करतो. आम्ही प्रार्थना करतो की जगाला ज्या गोष्टी दिसतात, जग जे काही ऐकते, वाचते आणि पाहाते ते सर्व तुला गौरव देणारे असू दे. माध्यमांनी घटनांचे वर्णन निपक्षपातीपणे करावे, जे केवळ सत्य व्यक्त करणारे असेल, प्रसिध्दी करणारे नसेल, असे होवू दे. आम्ही प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्यासाठी प्रार्थना करतो की आमच्या देशात ते अबाधित राखले जावे आणि विचार प्रगट करण्यास मोकळीक असावी. आम्ही प्रार्थना करतो की खेळामुळे समाज एक होईल, त्यामध्ये दुफळी पडणार नाही अशी आम्ही विनंती करतो. कला आणि करमणूक उद्योग निर्मीतीक्षम असोत आणि जे सुंदर आणि शुध्द आहे ते त्यांनी साजरे करावे. निर्मीती क्षमतेने जगाला तुझ्याकडे, तू जो निर्माणकर्ता त्याकडे आणावे.

## छळ होत असलेल्या चर्चसाठी प्रार्थना – रिलीज इंटरनॅशनल द्वारा

सार्वभौम देवा, आम्ही तुझी भक्ती करतो. आणि आम्ही मान्य करतो की जे तुझ्या नावामध्ये दुःख भोगीत आहेत ते तुला माहित आहेत.

आपल्या विश्वासासाठी जे तुरूंगात आहेत त्यांची आम्ही आठवण करतो आणि विनंती करतो की ते प्रेषित पौलाप्रमाणे पाहातील की जरी ते बंधनामध्ये आहेत, तरी त्यांच्या हातकडयांमुळे सुवार्तेला हाताश केले नाही तर पुढे नेले आहे.

त्यांच्याद्वारे सह विश्वासना–यांना प्रेरीत कर की त्यांनी देवाचे वचन अधिक धैर्याने आणि निर्भयपणे सांगावे.

सर्व सांत्वनाच्या देवा, ज्यांना शरीर आणि मनामध्ये वेदना दिल्या जात आहेत त्यांना सहन करण्यासाठी कृपा दे आणि त्यांचे दुःखसहन ख्रिस्ताच्या पावलावर पावूल ठेवून चालणे आहे हे पाहाण्यासाठी मदत कर.

दयाळू देवा, ज्यांना अंतिम किंमत चुकवावी लागत आहे; तुझ्यावरील त्यांच्या प्रेमामुळे जे रक्तसाक्षी होत आहेत, त्यांना ख–यारीतीने ख्रिस्त आणि त्याच्या पुनःरूत्थानाचे सामर्थ्य, त्याच्या दुःखातील वाटेकरी होणे आणि मरणामध्ये त्याच्यासारखे होणे काय आहे हे समजू दे.

देवपित्या, ज्या विधवा आणि जे अनाथ झाले आहेत त्यांना तुझ्या सान्निध्यातून सांत्वन मिळू दे, ज्याचे वचन तू दिले आहेस, जरी ते दरीतून जात आहेत.

तुझ्या आत्म्याकडून त्यांना शक्ती मिळो, स्तोत्रकर्त्या सोबत आंनद करण्यास त्यांना शक्ती दे, जेव्हा ते सांगतील की मरणामध्ये देव त्यांना टाकून देणार नाही.

स्वर्गीय पित्या, संपुर्ण जगामधील आमचे भाऊ आणि आमच्या बहिणी, ज्यांना आम्ही त्यांच्यासोबत उभे राहावे अशी गरज आहे, ते तुझ्या नावामध्ये दुःख भोगीत असतांना आम्ही अशांची जाणीव ठेवावी असे आम्ही मागतो.

आम्हाला शिकीव की, कोक–याच्या रक्ताने विजयी होणे आणि आमच्या साक्षीच्या शब्दांनी विजयी होणे म्हणजे काय. आम्ही प्रार्थना करतो की आम्ही जीवनावर एवढी प्रीति करू नये की ज्याकडून आम्ही मरणासमोर भयभीत होऊ. हे प्रभु, आमची प्रार्थना ऐक.

राष्ट्रासाठी प्रार्थनेचा दिवस

सर्व चर्चेसला आव्हान करण्यात येते की

16 ऑगस्ट 2020 हा दिवस प्रार्थना दिवस म्हणून पाळावा

आपल्या देशाच्या शांतीसाठी, सुबत्ता आणि स्थैर्यासाठी प्रार्थना करा

खिंडीमध्ये उभे राहा ! भारताला आशीर्वाद द्या

अधिक माहितीसाठी भेट द्या :

**www.nationaldayofprayer.in**

नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेस इन इंडिया आणि

इव्हॅंजेलिकल फेलोशिप ऑफ इंडिया

यांचे सौजन्याने